क्र. नों. म. नि./
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे कार्यालय, पुणे.
दिनांक -

**‘‘ प रि प त्र क ’’**

**<u>विषय</u> :– अंतर्गत लेखा परीक्षा पथकांना तपासणी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी.**

हया कार्यालयाच्या असे निदर्शनात आले की, जिल्हाधिकाऱ्यांकडील अंतर्गत लेखा परीक्षा पथके ही दुय्यम निबंधक यांची तपासणी करतात. परंतु जिल्हाधिकाऱ्यांकडील अंतर्गत लेखा परीक्षा पथकाची दुय्यम निबंधक कार्यालये जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली येत नाहीत, तर तो जिल्हा निबंधक व नोंदणी महानिरीक्षक हयांचे अधिपत्याखाली येतात. नोंदणी महानिरीक्षक, पुणे हयांचे कार्यालयात स्वतंत्र अंतर्गत - लेखा परीक्षा पथकाची निर्मिती शासन निर्णय क्र. आयएडब्ल्यू १०७७/ १७७७२१/ अकौंटंस युनिट दिनांक २५.८.१९८७ अन्वये करण्यात आली आहे. दुय्यम निबंधक कार्यालयांची लेखापरीक्षा केवळ हेच पथक करील, हयांची नोंद घ्यावी.

मा. नों.म.नि.
यांचे सहीचा असे.

सही /- xxx
(मो.वि. सरदेशमुख)
कार्यासन अधिकारी क्रमांक पाच व
सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, पुणे .

प्रत :-
१) सर्व सह जिल्हा निबंधक यांस योग्य त्या कार्यवाहीसाठी.
२) दुय्यम निबंधक मुंबई / सह दुय्यम निबंधक मुंबई यांस माहितीसाठी.
३) सर्व दुय्यम निबंधक यांसी माहितीसाठी.
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे - यांना माहितीसाठी.